मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४२१ वा • शनिवार, ता. ४ ऑक्टोबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००


## कतारमध्ये उभे राहत आहे जगातील सर्वात मोठे एम.एफ. हुसेन संग्रहालय

**दोहा । रयत समाचार**

महाराष्ट्र राज्यातील पंढरपूर येथे जन्मलेले भारताचे चित्रसम्राट एम.एफ. हुसेन यांच्या कलासृष्टीला एक नवे घर मिळणार आहे. कतार फाउंडेशनतर्फे उभारण्यात आलेले 'लौह वा कलम : एम. एफ. हुसेन म्युझियम' येत्या २८ नोव्हेंबर २०२५ रोजी दोहा येथील एज्युकेशन सिटीमध्ये सर्वांसाठी खुले होणार आहे. सुमारे ३२,३०० चौ.फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे जागतिक पातळीवरील पहिले व सर्वात मोठे संग्रहालय असणार. संग्रहालयाची रचना स्वतः हुसेन यांनी २००८ मध्ये काढलेल्या रेखाटनावर आधारित आहे. त्यांच्या 'M.F. Husain Art & Cinema Museum' या स्केचमध्ये वाळवंटातील वाळू, खजुरी झाडे आणि काळ्या-निळ्या भौमितिक आकृत्यांतून सजलेली इमारत, तर पिवळा मार्ग हा सिनेमाच्या लाल गालिच्याची आठवण करून देणारा होता. आज तोच त्यांच्या स्वप्नातील आराखडा प्रत्यक्षात साकार होत आहे.



येथील कायमस्वरूपी प्रदर्शित संग्रहात हुसेन यांची चित्रे, शिल्पकला, छायाचित्रण, कविता, चलचित्रे व स्थापत्यकृती सामावल्या आहेत. विशेष आकर्षण ठरणार आहे त्यांचे शेवटचे उत्कृष्ट कलाकृती 'सीरू फी अल अरध' मानवजातीच्या प्रगतीचे दर्शन घडवणारा एक अनोखा अनुभव. त्याचबरोबर अरब संस्कृतीवर आधारित ३५ चित्रमालिकाही दाखविण्यात येतील, जी कतार फाउंडेशनच्या अध्यक्षा शेखा मोझा बिंत नासर यांच्या विनंतीवरून हुसेन यांनी साकारली होती. हुसेन यांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या दशकात भारतापासून दूर राहत असले तरी सिनेमा, वारसा आणि कथा सांगण्याची आस कायम ठेवली होती. Through the Eyes of a Painter (१९६७), गजगामिनी (२०००) आणि मीनाक्षी (२००४) सारख्या चित्रपटांतून हे प्रकर्षाने दिसून येते. कतारमधील हे संग्रहालय म्हणजे कलाविश्वाला दिलेला त्यांचा शाश्वत संदेश ठरणार आहे. जग म्हणजे सिनेमा आणि कॅनव्हास म्हणजे कविता.

## मराठी ही कालही अभिजात होती, आजही आहे आणि उद्याही राहील- फडणवीस



**मुंबई । रयत समाचार**

भाषा ही संस्कृती जिवंत ठेवण्याचे माध्यम आहे. देशातील प्रत्येक भाषेने सांस्कृतिक ठेव दिलेली आहे. मातृभाषा आणि इतर भाषांना जिवंत ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. मराठी ही कालही अभिजात होती, आजही अभिजात आहे आणि उद्याही अभिजात राहील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे आयोजित 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस' व 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, मराठीचा सन्मान हा आपल्या सर्वांचा सन्मान आहे. गावोगावी गायल्या जाणाऱ्या ओव्या, रामप्रहरी येणारे वासुदेव, देवळातील आरत्या-भजने, संतपरंपरेतील अभंग, शाहिरांच्या पोवाड्यांपासून संत ज्ञानेश्वरांच्या भावार्थ दीपिकेपर्यंत आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वचिंतनापर्यंत ही मराठी भाषा समृद्ध झाली आहे. यावेळी विविध प्रकाशनांचा लोकार्पण सोहळा पार पडला. त्यामध्ये 'हेमांगी अंक', 'नवभारत मासिक विशेषांक', 'मराठीचीये कौतुके' (रेडिओवरील मुलाखती), संदर्भ ग्रंथालय माहिती पुस्तिका तसेच ओटीटी प्लॅटफॉर्मवरील 'अभिजात मराठी' ॲपचा समावेश होता. विशेष म्हणजे, भारतीय टपाल विभागाने अभिजात मराठी दिनानिमित्त विशेष टपाल तिकिट व आवरणाचे अनावरण केले. कार्यक्रमाला विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, सदस्य मनीषा कायंदे, मुख्य पोस्टमास्टर जनरल अमिताभ सिंग, महाराष्ट्र राज्य विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष रवींद्र शोभणे, साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सदानंद मोरे, विदर्भ साहित्य संघाचे प्रदीप दाते तसेच अभिनेता व निर्माते महेश मांजरेकर उपस्थित होते. मराठी भाषेच्या अभिजात सन्मानाला समर्पित हा सोहळा, मराठीच्या गौरवशाली परंपरेला नव्या उंचीवर नेणारा ठरला.



## सम्यकच्या प्रवासाला अठरा वर्षे पूर्ण; १९व्या वर्षात नवी उर्मी

**पुणे । रयत समाचार**

समाजातील न्याय, समानता आणि शांततेच्या मूल्यांवर आधारित कार्य करणाऱ्या 'सम्यक' संस्थेला आज अठरा वर्षे पूर्ण झाली असून संस्थेने १९व्या वर्षात प्रवेश केला आहे.

३ ऑक्टोबर २००७ रोजी गांधी जयंतीनंतरच्या दुसऱ्याच दिवशी नोंदणीकृत झालेल्या या संस्थेने स्त्रीवादी दृष्टिकोनातून लिंगभेद, पुरुषत्व, प्रजनन आरोग्य हक्क, तसेच विकास प्रक्रियेत लक्षणीय योगदान दिले आहे. या प्रवासात वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, सार्वजनिक आरोग्यसेवा पुरवठादार, नागरी समाज संघटना, माध्यम प्रतिनिधी, शैक्षणिक क्षेत्र, तसेच पंचायतराज संस्थांमधील निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींशी दृढ नाते निर्माण केले आहे. हा संपूर्ण प्रवास आमच्या संचालक मंडळ, समुदाय, कर्मचारी, इंटर्न्स, भागीदार, मार्गदर्शक, सहकारी, लेखापरीक्षक, पुरवठादार आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आमच्या दात्यांच्या विश्वास आणि सहकार्यामुळे शक्य झाला आहे, असे सम्यकच्या वतीने आनंद पवार यांनी सांगितले. आव्हानांना सामोरे जात, कृतज्ञतेने आणि नव्या उत्साहाने पुढे जाण्याचा निर्धार व्यक्त करत सम्यकने १९व्या वर्षाच्या वाटचालीस सुरुवात केली आहे.

## घराघरापर्यंत रस्ते पोहोचवले – आ.पाटील



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

माझ्या आमदारकीच्या काळात मी केवळ विकास कामांवर लक्ष केंद्रित केले आहे. जात, भाषा वा पक्ष न पाहता मतदारसंघातील विकास कसा होईल यावरच माझा भर असतो. येळ्ळूर गावाने गेल्या चार वेळच्या निवडणुकांमध्ये मला कमी मतदान दिले, याचा अर्थ असा नव्हे की या गावाचा विकास करू नये. घराघरापर्यंत रस्ते पोहोचवले असून पुढील अडीच वर्षांच्या काळात येळ्ळूरवासीयांच्या मनापर्यंत पोहोचणार आहे,'' असा विश्वास बेळगाव दक्षिणचे आमदार अभय पाटील यांनी व्यक्त केला. अभय पाटील यांनी नुकताच येळ्ळूर गावाचा दौरा करून तेथील समस्यांची माहिती घेतली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, ''२००८ साली या भागातील शेतवाडीतील रस्ते माझ्या कारकीर्दीत तयार झाले. आता १४ वर्षांनी ते रस्ते खराब झाले असून त्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. तसेच गावातील सरकारी शाळांसाठी ४० ते ५० लाखांचा निधी खर्च केला आहे. गावातील मुख्य रस्ते, पाणी योजना, गटार व अन्य महत्त्वाची कामे माझ्या कार्यकाळात पूर्ण झाली आहेत.'' ते पुढे म्हणाले की, ''मागील निवडणुकांमध्ये येळ्ळूर गावातून मला कमी मतदान मिळाले. मात्र, याचा अर्थ असा नाही की गावाचा विकास थांबवावा. मला जात, भाषा किंवा पक्ष यापेक्षा जनतेच्या अडचणी सोडवण्याला प्राधान्य आहे. रस्ते घराघरापर्यंत पोहोचले असून पुढील काळात गावकऱ्यांच्या मनापर्यंत पोहोचणार आहे.

रयत समाचार

## ९ ऑक्टोबरला जेआरडी टाटा पुरस्कार प्रदान सोहळा

**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास परिषद, पुणे आयोजित भारतरत्न जेआरडी टाटा आणि उद्योगमहर्षी रतन टाटा पुरस्कार प्रदान सोहळा गुरुवारी ता. ०९ ऑक्टोबर रोजी दुपारी ठीक ०४ वाजता ऑटोक्लस्टर सभागृह, सायन्स पार्कसमोर, जुना मुंबई- पुणे महामार्ग, चिंचवड येथे संपन्न होणार आहे. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून आंतरराष्ट्रीय उद्योग सल्लागार सचिन ईटकर अध्यक्षस्थान भूषविणार आहेत; तसेच टाटा मोटर्स लिमिटेडचे निवृत्त वरिष्ठ महाव्यवस्थापक मनोहर पारळकर आणि महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास परिषदेचे अध्यक्ष सुदाम भोरे यांची प्रमुख उपस्थिती राहील.

## विखे, कोल्हेंना मोठी संधी मिळण्याचे संकेत

### प्रवरानगर कोपरगावात शक्तीप्रदर्शन

**श्रीरामपूर । शफीक बागवान**



मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यावरून क्षणात राज्यभर प्रकाश झोतात आलेले जलसंपदा तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि संधी मिळत असताना देखील राजकारणात हुलकावणी मिळत गेल्यामुळे विवेक कोल्हे यांचे पाऊल रोजच पुढे पुढे पडत आहे. ता. ५ ऑक्टोबर रोजी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना विस्तारित क्षमता उद्घाटन, तसेच पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण व जाहीर सभा तर कोपरगाव येथे सहकार महर्षी शंकरराव कोल्हे साखर कारखाना, तसेच मल्टी-फ्रीड कॉम्प्रेस्ड प्लँटचे उदघाटन केंद्रीय सहकार मंत्री आणि भाजपाचे सर्वे सर्वा अमित शहा यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार आहे. शहा आणि फडणवीस हे दोघेही एकत्रित आणि पहिल्यांदाच विखे कोल्हेंच्या बालेकिल्ल्यात येत आहेत. यामुळे राजकारण्यांच्या भुवया उंचावल्या आहेत. राजकारणात विखे यांना मंत्री मंडळातील सर्वात उंच असलेले स्थान मिळण्याची यानिमित्ताने आशा निर्माण झाली आहे. तर विवेक कोल्हे यांना राज्यसभा किंवा विधानपरिषदेत पुनर्वसन होण्याची संधी निर्माण झाली आहे. प्रवरानगर आणि कोपरगाव या दोन्हीही कार्यक्रमाच्या निमित्ताने राधाकृष्ण विखे आणि माजी आमदार स्नेहलता कोल्हे तसेच विवेक कोल्हे यांचे राजकीय वर्चस्व सिद्ध झाले आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात राधाकृष्ण विखे यांनी घेतलेला निर्णय हा मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस आणि मराठा समाजाला विश्वास देणारा ठरला आहे. यावरून विखे यांची राजकारणात उंची वाढली आहे. मंत्रिमंडळात त्यांना यापेक्षा अधिक उच्च स्थान मिळावे, यासाठी महाराष्ट्रातील जनता आतुर झाली असून आणि तशी या आणि फडवणीस यांच्या दौऱ्यानिमित्ताने आशाही निर्माण झाली आहे. भाजपात राधाकृष्ण विखे यांच्या आधी विराजमान झालेल्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे आणि विवेक कोल्हे हे अद्यापही केंद्र आणि राज्यात भाजपाची सत्ता असताना देखील सत्तेपासून चार हात दूर आहेत. कोल्हे यांचे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी राजकारणात मोठी जवळीक आहे.



**शफीक बागवान**
९८६०४००६८५
श्रीरामपूर

**राजकी बात**

शिक्षक पदवीधर मतदार संघ तसेच तत्पूर्वी कोपरगाव विधानसभा मतदारसंघात विवेक कोल्हे यांना भरभरून संधी असताना देखील त्यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या आश्वासनाने दोन पावले मागे घेतली होती. विवेक कोल्हे यांना राज्यसभेवर घेत त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल, अशी राजकीय क्षेत्रात त्यावेळी चर्चा रंगली होती. मात्र अद्यापही ती फळाला आली नाही. विवेक कोल्हे तेव्हापासून तर आजतागायत सत्ता असताना तसेच त्यांचे पुनर्वसन होण्याची संधी असताना देखील त्यांना हुलकावणी मिळत आहे. मराठा आरक्षणावरून राधाकृष्ण विखे यांची क्रेझ सध्या संपूर्ण महाराष्ट्रात चर्चिली गेली आहे. विखे यांनी आजपर्यंत वेगवेगळ्या पक्षात राहून अनेक मंत्रिपदे भूषविली असली तरी त्यांना मुख्यमंत्रीपद अद्यापही मिळालेले नाही. अमित शहा हे भाजपातील सर्वोच्च नेते मानले जातात. विखे आणि कोल्हे यांनी त्यांना आमंत्रित करीत वेगवेगळ्या राजकीय चर्चेला मोकळीक करून दिली आहे. राधाकृष्ण विखे यांना मुख्यमंत्री पद तर विवेक कोल्हे यांचे राजकीय पुनर्वसन या दोन्हीही नेत्यांचे भवितव्य सध्यातरी गुलदस्त्यात आहे.

## सोनम वांगचुग आमचा माणूस, अन्यायाने जेलात; आंबेडकरी जनतेची भूमिका

**मुंबई । रयत समाचार**

सोनम वांगचुग यांना तातडीने सोडले पाहिजे. तो आमचा माणूस असून भाजपानेतृत्वातील सरकारने पूर्वग्रहदूषित हेतूने त्यांना जेलमध्ये डांबले आहे. जर हे सत्य आंबेडकरी जनतेच्या कानावर आले, तर लोकांमध्ये तीव्र संताप निर्माण होईल, असे प्रतिपादन धम्मसंगिनी रमागोरख यांनी केले. त्यापुढे म्हणाल्या, काल ता.३ ऑक्टोबर रोजी दिक्षाभूमीवर झालेल्या बैठकीत ६ व्या सूचीत लडाखचा समावेश करून त्याला आदिवासी राज्याचा दर्जा मिळावा यासाठी कार्यकर्त्यांमध्ये सहमती झाली आहे. लडाखमधील सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक वैशिष्ट्ये पाहता हा



दर्जा आवश्यक असून, त्यासाठी आमचा संघर्ष पुढेही सुरू राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. आंबोडकराईट रिपब्लिकन्स फेडरेशनच्या बैठकीत उपस्थित कार्यकर्त्यांनी सोनम वांगचुग यांच्या सुटकेसाठी एकत्रित लढा देण्याचे ठरवले. आगामी काळात या प्रश्नावर मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## अघोरी 'डंबा' प्रथा रोखण्यासाठी मेळघाटात अंनिसची जनजागृती मोहीम

### ४३१ कार्यक्रम, ३२३ गावे कव्हर



**अमरावती । रयत समाचार**

मेळघाटाच्या चिखलदरा व धारणी तालुक्यांतील आदिवासीबहुल भागात आजही आजारी मुलांच्या पोटावर दरातीने चटके देण्याची ''डंबा'' ही अघोरी व जीवघेणी प्रथा सुरू आहे. अंधश्रद्धा, अज्ञान व आगतिकतेतून वाढलेल्या या प्रथेविरोधात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने मोठी जनजागृती मोहीम उभारली. मार्च ते सप्टेंबर २०२५ या सहा महिन्यांच्या कालावधीत तीन टप्प्यात पार पडलेल्या मोहिमेत ३२३ गावे, ४३१ प्रबोधन कार्यक्रम घेऊन गावोगावी लोकांशी संवाद साधण्यात आला. या मोहिमेत नंदिनी जाधव, भगवान रणदिवे, मिलिंद देशमुख, शंकर कणसे, डॉ. अरुण बुरांडे, श्रीकृष्ण धोटे, वंदना शिंदे, रामभाऊ डोंगरे, अनिश पटवर्धन, सागर बावणे यांसह अंनिसचे कार्यकर्ते सहभागी झाले. कधी चौकातील सोलर दिव्याखाली, तर कधी गाडीच्या हेडलाईटच्या प्रकाशात कार्यकर्त्यांनी चमत्कार प्रात्यक्षिके व जनसंवाद आयोजित केला. अंनिस कार्यकर्त्यांनी शाळा, आश्रमशाळा, अंगणवाडी, आशा वर्कर बैठकींतून लोकांना समजावले की, बाबा-बुवांचे चमत्कार खोटे असून आजारांवर योग्य उपचार फक्त डॉक्टरांकडूनच होऊ शकतात. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी क्रोधापेक्षा करुणा, उपहासापेक्षा आपुलकी गरजेची या डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या तत्त्वांचा वापर केल्याने कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला. या मोहिमेला राज्याचे आरोग्य सचिव डॉ. निपुण विनायक, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा, तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व आशा, अंगणवाडी सेविका यांचे सहकार्य लाभले. मोहिमेच्या पहिल्या टप्प्यानंतर आरोग्य विभागाने कोरकू भाषेत व्हिडिओ व पोस्टर्सद्वारे जनजागृती मोहीम हाती घेतली. अंनिसच्या मते, दवाखान्याऐवजी मांत्रिकाकडे धाव घेण्याची मानसिकता शिक्षण, आरोग्यसेवा, रस्ते, पाणीपुरवठा, मोबाईल नेटवर्कचा अभाव आणि व्यसनाधीनता, बालविवाह अशा अनेक सामाजिक प्रश्नांशी जोडलेली आहे. रूढीपरंपरा व अज्ञान यांच्या पाशातून लोक बाहेर पडावेत, यासाठी जनजागृतीसोबतच जादूटोणा विरोधी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे. अंनिसने लोकप्रतिनिधी, पंचायत राज संस्था, आरोग्य कर्मचारी यांच्या प्रशिक्षणावर भर देण्याचा निर्णय घेतला असून, गावागावात जादूटोणा विरोधी कायद्याची माहिती असलेले फलक लावण्यासाठी लवकरच पाठपुरावा केला जाणार आहे.

**धारणी तालुक्यातील चौपन गावात एका महिन्याच्या बाळाला तीन दिवस शौच न झाल्याने चटके देण्यात आल्याचा प्रकार उघड झाला. स्थानिक आरोग्य सेविकेच्या दक्षतेमुळे बाळाला तातडीने दवाखान्यात दाखल करण्यात आले. त्यापूर्वी दहेंद्री येथे रडणाऱ्या बाळाला ''भूतबाधा'' समजून त्यालाही चटके देण्यात आले होते. या प्रकरणी मांत्रिकाविरोधात गुन्हा दाखल झाला. अंनिसने अशा घटना त्वरित आरोग्य विभागाला कळविण्याचे आणि गरज पडल्यास कायदेशीर कारवाईचे आवाहन केले आहे.**

## बंजारा तांड्यांचा विकास वेगाने : २ कोटी ५ लाखांचा निधी वितरित

**पाथर्डी । नितीन गटाणी**

संत सेवालाल महाराज बंजारा लमाण तांडा समृद्धी योजनेअंतर्गत जिल्ह्यातील वीस लमाण तांड्यांसाठी मंजूर झालेला तब्बल २ कोटी ५ लाख रुपयांचा निधी अखेर तांड्यांमध्ये वितरित करण्यात आला आहे. या निधीतून प्रत्येक तांड्यासाठी स्मशानभूमी विकास व पोहच रस्त्यांसाठी १० लाख रुपये मंजूर झाले असून, तांडा विकासाला नवी गती मिळणार आहे. पाथर्डी तालुक्यातील कोकिसीपीर तांडा, घुमटवाडी, कुरण तांडा, वसंतराव नाईक नगर, सेवागड, भवानीनगर, काकडदरा तांडा, आंबेवाडी तांडा, सेवानगर तांडा, भगवानगड तांडा, सुरसवाडी तांडा, दुर्गानगर तांडा, हनुमाननगर तांडा, शेवगाव तालुक्यातील रामनगर तांडा, लक्ष्मीवाडी तांडा, नगर तालुक्यातील पवार तांडा, चव्हाण वस्ती तसेच पारनेर तालुक्यातील पठारवाडी तांडा, पवार मळा तांडा आणि भोकरदरा तांडा यांना या योजनेचा लाभ झाला आहे. योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य वैद्यकीय कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक, संयोजक श्रावण चव्हाण, गोर विचारवंत प्रा. फुलशिंग नाईक, जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, सदस्य सचिव राहुल शेळके तसेच समितीचे अशासकीय सदस्य विष्णुपंत पवार, नवनाथ चव्हाण, लक्ष्मण राठोड आणि संजय पवार यांनी मोलाचे सहकार्य केले.



समितीचे अशासकीय सदस्य विष्णुपंत पवार यांनी माहिती देताना सांगितले, संत सेवालाल महाराज बंजारा लमाण तांडा समृद्धी योजना ही तांडा वस्तीच्या जीवनमानात लक्षणीय बदल घडवेल. स्मशानभूमी व रस्ते सुविधा उपलब्ध झाल्याने तांडा विकासाला वेग येणार आहे. तांड्यांमध्ये होत असलेल्या या विकासामुळे बंजारा समाजामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. रयत समाचार

# फुटपाथ उतरतो थेट नाल्यात; महानगरपालिका, पीएमसीचा प्रताप

## जीवीतहानीची जबाबदारी मनपा प्रशासकाची की पीएमसीची?





**अहमदनगर । रयत समाचार**

सिंग हॉटेल ते कृष्णा एन्क्लेव्ह या जुन्या आरटीओ ऑफिससमोरील सिमेंट काँक्रिट रस्त्याचा फुटपाथ थेट नाल्यात उतरत असल्याने पायी चालणाऱ्या माणसांची जीवितहानी होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. हा रस्ता जवळजवळ फायनल होत आला असून काही बीलही निघल्याचे समजते. रयत समाचारचे प्रतिनिधी येथून जात असताना त्यांच्या लक्षात ही गंभीर बाब आली. पण या रस्त्याचे सुपरव्हिजन करणारे मनपा अधिकारी यांना ही बाब दिसली नसल्याचे आश्चर्य व्यक्त होत आहे.

नगरोत्थान योजनेमधून हा रस्ता झाला असून लातूर येथील प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्ट या एजन्सीकडे सर्व काम असल्याचे अहिल्यानगर मनपा अभियंते इंजि. मनोज पारखे यांनी सांगितले. रस्त्याचे आराखडे, त्याची मंजूरी, त्यानूसार टेंडर आणि संपूर्ण काम करून घेण्याची जबाबदारी पीएमसीकडे आहे. पण यावर देखरेख करण्याचे काम मनपा अधिकारी यांचे आहे.

जुन्या आरटीओ ऑफिससमोरून सिंग हॉटेलकडे फुटपाथवरून जाताना हा फुटपाथ थेट नाल्यात उतरतो. कारण येथील पुल अरूंद केला असून रस्ता व फुटपाथ पूलाबाहेर आहेत. यामुळे दिवसा व रात्री पायी चालणारी व्यक्ती थेट नाल्यात पडून जीवीतहानी होऊ शकते. अशी दूर्घटना झाल्यास याची जबाबदारी अहिल्यानगर मनपा प्रशासक की बेजबाबदारपणे काम करणारी पीएमसी हा प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्यावरील चुकीच्या कामामुळे अपघात झाल्यास अभियंते व प्रमुख अधिकारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे उच्च न्यायालयाचे काही आदेश आहेत.

### पायी चालणारांचे हक्क अधिकार अबाधित पाहिजेत



**आम्ही सारे भारतीय संघटनेचे संस्थापक ॲड. निरज धुमाळ यांनी राईट टू वॉक विथ ऑनर या मूलभूत अधिकाराच्या संरक्षणार्थ मोहीम हाती घेतली आहे. पायी चालणे हा निसर्गाने दिलेला जन्मदत्त असा अधिकार आहे. तसेच भारतीय संविधानाने दिलेला फंडामेंटल राईट अर्थात मूलभूत अधिकार आहे, आमचा हा अधिकार काढून घेण्याचा कोणालाही अधिकार नाही, अशी स्पष्ट भूमिका आम्ही सारे भारतीय संघटनेने घेतलेली आहे. शिवाय राईट टू लाईफ ईफ विथ अंतर्भूत आहे त्यामुळे याबाबतीत आमच्या मूळ मानवी अधिकारांपासून सुरक्षित पर्सनल लिबर्टी हा कायदा ह्युमन राईटच्या डिक्लेरेशनमध्ये सुद्धा हा अधिकार आहे. त्यामुळे त्याचे उल्लंघन होता कामा नये.**

# नागरिकांनी स्वदेशी वस्तू वापराकडे वळावे– मोहिते

## पारिजात चौकात रावणदहन

**अहमदनगर । रयत समाचार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला स्वदेशी वस्तू वापराकडे वळावे, आत्मनिर्भर भारत घडवावा असे आवाहन केले आहे. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर प्रत्येकाने या संकल्पाची पूर्तता करावी, जागतिक स्तरावर रचल्या जाणाऱ्या षड्यंत्रांना उत्तर देण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्वदेशी वस्तूंचा वापर आवश्यक आहे, असे प्रतिपादन भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले. पारिजात चौक गुलमोहर रोड प्रतिष्ठानच्या वतीने नवरात्री व दसरा सणानिमित्त विघातक शक्तीच्या रावणाचे दहन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तोफखाना



पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कोकरे, ज्येष्ठ माजी नगरसेवक रामदास आंधळे, भाजप महिला शहर जिल्हाध्यक्ष प्रिया दानवे, माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, अशोक गायकवाड, नितीन शेलार, राहुल आंधळे, बाळासाहेब सोनवणे, बापू जानवे आदी मान्यवरांसह प्रतिष्ठानचे सभासद व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी नगरसेवक रामदास आंधळे म्हणाले की, पारिजात चौक येथे गुलमोहर रोड प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी फटाक्यांच्या आतषबाजीसह रावण दहन करण्यात येते. सावेडी उपनगरातील नागरिक मोठ्या संख्येने यात सहभागी होतात. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर चांगल्या विचारांचा संकल्प करून पुढील वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले.

# माऊंट सिनाय स्कूलचे तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत यश

**नगर तालुका । रयत समाचार**



नुकत्याच आर्मी स्कूल येथे पार पडलेल्या नगर तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्पृहणीय यश संपादन केले.

सतरा वर्षे वयोगटातील लांब उडी प्रकारामध्ये साक्षी राठोड हिने प्रथम क्रमांक व २०० मीटर धावणे प्रकारात तृतीय क्रमांक तर दक्ष अंकुश याने थाळी फेकमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. दोघांचीही प्रवरानगर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तसेच चौदा वर्षे वयोगटातील गोळा फेक प्रकारात शिफा शेख हीने तृतीय क्रमांक पटकाविला. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक किशोर उबाळे व मुजहिद शेख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



# सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत गांधी–शास्त्री जयंती उत्साहात साजरी

**अहमदनगर । आबीद खान**

मुकुंदनगरयेथीलमोहंमदीया एज्युकेशन सोसायटीच्या सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात व आदराने साजरी करण्यात आली. या प्रसंगी मुख्याध्यापक नौशाद सय्यद यांच्या अध्यक्षतेखाली सन्माननीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी गांधीजी आणि शास्त्रीजींच्या जीवनसंघर्षाचे स्मरण करून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. यशाचे रहस्य केवळ कठोर परिश्रमात असून विद्यार्थी काळात पुस्तकांशी घट्ट नाते राखणे महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्साही पद्धतीने भाषणे सादर केली. असलम पटेल यांनी गांधीजींच्या जीवनावर विचार मांडले. सुलताना शेख यांनी गांधीजींच्या सत्य व अहिंसेच्या तत्त्वांवर प्रकाश टाकला. शेख फरजाना यांनी स्वातंत्र्यलढ्यातील गांधीजींचे योगदान स्पष्ट केले, तर शाहीन शेख यांनी शास्त्रीजींच्या साध्या पण महान व्यक्तिमत्त्वाबद्दल माहिती दिली. शेवटी शेख हीना यांनी आभार मानले. या कार्यक्रमात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यावेळी पठाण फरहान, उज़मा, यास्मिन शेख, हीना शेख, शाहीन शेख, फरजाना शेख, असलम पटेल आदी उपस्थित होते. रयत समाचार

# अहमदनगर रिहॅब फिजिओथेरपी सेंटरकडून शिबिराचे आयोजन

**अहमदनगर । रयत समाचार**

अहमदनगर रिहॅब फिजिओथेरपी सेंटरच्या वतीने पाठदुखी, कंबरदुखी आणि संधीवातासह विविध स्नायू–संधी विकारांवर लक्ष केंद्रित करणारे मोफत शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

यामध्ये फिजिओथेरपीवर मोफत सल्ला तसेच उपचारांवर ५०% सवलत दिली जाईल. दररोज वाढत असलेल्या मणके, स्पोर्ट्स इंज्युरी, गुडघेदुखी, मानदुखी, खुबदुखणे, माकड हाड दुखणे, सायटिका, हाता–पायाला मुंया येणे, अर्धशीशी चक्कर येणे, खांदे दुखी (फ्रोझन शोल्डर), टाच दुखणे, मणक्यांत गॅप पडणे, मणक्याची गादी सरकणे, मणक्यांत बाक येणे इत्यादी विकारांवर लक्ष देण्यात येणार आहे. शिबिर सोमवार, ता. ६ ते ११ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे, अशी माहिती सेंटरचे फिजिओथेरपीस्ट डॉ. किशनगोपाल राजपूत यांनी दिली.

शिबिराचा उद्देश अत्याधुनिक पद्धतीने रुग्णांच्या वेदना कमी करणे आणि सांधेदुखी, पाठदुखी, मानदुखी, कंबरदुखी, संधीवात, पक्षाघात (पॅरेलेसिस, स्ट्रोक), स्पाँडिओलेसिस, स्लीप डिरक व खेळाडूंकरिता पुनर्संचयन उपचार प्रदान करणे आहे. शिबिरात ऑस्टिओपॅथी, कायरोप्रॅक्टीक, शॉकव्हेवथेरपी, क्रायो थेर्पी, पी.ई.एम.एफ. थेरेपी, लेसर थेरपी अशा अत्याधुनिक उपचार पद्धतींचा वापर करून रुग्णांचे निदान व वैयक्तिक उपचार केले जातील. अनुभवी फिजिओथेरपिस्ट, ऑस्टिओपँथ व कायरोप्रॅक्टर मार्गदर्शन करतील.

शिवीरात निवडलेल्या रुग्णांवर अपॉईंटमेंटनुसार सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध असतील. सर्वांनी या मोफत शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शिबिरासाठी नाव नोंदणी आवश्यक असून नोंदणीसाठी अहमदनगर रिहॅब सेंटर, ४था मजला, वेदांत टॉवर, प्रेमदान चौक, नोबल हॉस्पिटल शेजारी, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा. फोन क्रमांक: ०२४१ – ३५८७७४६ / ७३५०१८०००१.

# फुटबॉल प्रशिक्षण शिबिरासाठी आव्हाड, गाडळकरची निवड

**अहमदनगर । रयत समाचार**



अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या सब–ज्युनियर संघातील खेळाडू सम्राट राजकुमार आव्हाड व आयुष महेंद्र गाडळकर यांची महाराष्ट्र सब–ज्युनियर प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली आहे. हे शिबिर मुंबई येथे ता. ७ ते २६ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे. ही निवड मे २०२५ मध्ये शिरपूर (धुळे) येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरजिल्हा सब–ज्युनियर बॉईज फुटबॉल स्पर्धा २०२४–२५ मधील उल्लेखनीय कामगिरीच्या आधारे झाली आहे.

या शिबिरातून अंतिम संघात निवड झालेल्या खेळाडूंना महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार असून, राष्ट्रीय सब–ज्युनियर बॉईज फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२५–२६ अमृतसर (पंजाब) येथे ता. २८ ऑक्टोबरपासून आयोजित करण्यात आली आहे.

या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, जोगासिंग मिन्हास, अमरजितसिंग शाही, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ, खजिनदार रिशपालसिंग परमार, सहखजिनदार रणबीरसिंग परमार, राजू पाटोळे, जिल्हा सब–ज्युनियर बॉईज संघ प्रशिक्षक अभिषेक सोनावणे, संघ व्यवस्थापक रोहन कुकरेजा तसेच सर्व पदाधिकारी व सदस्यांनी अभिनंदन करून खेळाडूंना पुढील प्रशिक्षण व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. मागील वर्षभरात जिल्ह्यातील खेळाडूंची सातत्याने विविध वयोगटांमध्ये राष्ट्रीय शिबिरासाठी निवड होत आहे. त्यापैकी सात खेळाडूंनी अंतिम संघात स्थान मिळवून राष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे मत जिल्हा संघटनेचे सचिव रोनप फर्नांडिस यांनी व्यक्त केले.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१– माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२– वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर–सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज–नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
– संपर्क –
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर–०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद–विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# संजीवनीचे तंत्रज्ञान साखर उद्योगाला दिशा देणारे- कोल्हे

**कोपरगाव । किसन पवार**

बदलत्या मुक्त अर्थव्यवस्थेत सहकार क्षेत्रासमोर उभ्या राहणाऱ्या आव्हानांना समर्थपणे तोंड देण्यासाठी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने काळानुरूप अत्याधुनिक बदल करून देशभरात आदर्श निर्माण केला आहे. ''स्पेंटवॉशपासून बायोगॅस निर्मिती, ऊसाच्या रसापासून थेट इथेनॉल उत्पादन, बायो-सीएनजी आणि पोटॅश ग्रॅन्युएल खत निर्मितीचे प्रयोग सर्वप्रथम संजीवनीने राबवले. त्यामुळेच संजीवनीचे तंत्रज्ञान देशातील साखर उद्योगाला दिशा देणारे ठरले आहे,'' असे प्रतिपादन संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी



केले. सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या ६३ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ विजयादशमीच्या मुहूर्तावर अध्यक्ष विवेक कोल्हे, संचालक विश्वास महाले व चित्रा महाले यांच्या हस्ते पार पडला. यावेळी स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविकात कार्यकारी संचालक सुहास यादव यांनी सांगितले की, चालू हंगामात ७ लाख ५० हजार मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यानुसार आधुनिकीकरणाची कामे अंतिम टप्प्यात आहेत. उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे व सरव्यवस्थापक शिवाजी दिवटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. बिपीन कोल्हे म्हणाले की, ''देशातील सर्व पायलट प्रकल्पांची यशस्वी उभारणी सर्वप्रथम संजीवनीत झाली. नॅशनल शुगर इन्स्टिट्यूट, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटसह देशातील विविध संशोधन संस्थांनी येथे येऊन प्रयोगांचा अभ्यास केला आहे. चालू हंगामापासून रानवड सहकारी साखर कारखाना संजीवनीचे युनिट दोन म्हणून कार्यरत झाला आहे.'' त्यांनी पुढे सांगितले की, ''वाहनांसाठी लागणारे बायो-सीएनजी आणि शेतकऱ्यांना आवश्यक असलेले पोटॅश खत तयार झाले असून, याचे लोकार्पण ५ ऑक्टोबर रोजी केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. ही संजीवनीच्या वाटचालीतील ऐतिहासिक घटना ठरेल.'' मत्स्यपालन, मोत्यांची शेती, बांबू लागवड, खत प्रकल्प यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांतून संजीवनीने वेगळी ओळख निर्माण केली असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास माजी सभापती शिवाजी वक्ते, त्र्यंबक सरोदे, संचालक, कामगार नेते, विविध संस्था व संघटनांचे प्रमुख उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिव तुळशीराम कानवडे यांनी केले, तर आभार संचालक रमेश घोडेराव यांनी मानले.

रयत समाचार



## पूरग्रस्तांना दिलासा, १०० कुटुंबांना किराणा वाटप

### नारायण बाबा काळे चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव तालुक्यातील पूरग्रस्त भागात गरजू नागरिकांसाठी नारायण बाबा काळे चॅरिटेबल ट्रस्टतर्फे किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे परिसरात भीषण परिस्थिती निर्माण झाली असून, अनेकांची घरे व शेती उद्ध्वस्त झाली आहे. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन ट्रस्टचे अध्यक्ष श्रीराम काळे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. चैतन्य काळे व ऋषिकेश काळे यांच्या पुढाकाराने तातडीने मदतीचे काम हाती घेण्यात आले. ट्रस्टमार्फत भायगाव, देवटाकळी व काळेगाव या गावांतील १०० गरजू कुटुंबांना किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन आदर्श गाव वाघोलीचे सरपंच उमेश भालसिंग यांच्या हस्ते पार पडले. सरपंच भालसिंग म्हणाले, ''नारायण बाबा काळे चॅरिटेबल ट्रस्ट ही संस्था सतत सामाजिक कार्यात अग्रेसर राहिली आहे. गरजूंना केवळ सहानुभूती नव्हे तर कृतीद्वारे मदत पोहोचविण्याचा या संस्थेचा ध्यास वाखाणण्याजोगा आहे.'' या प्रसंगी लोळेगाव सरपंच भानुदास काळे, भायगाव सरपंच राजेंद्र आढाव, महादेव पवार, योगेश काळे, अविनाश लोखंडे, सुधीर काळे, सर्जेराव जाधव, सुनील शिनगारे, गोकुळ पठाडे, चेअरमन गणपत आढाव, बाळू बुचकुल, उपसरपंच सोपान लांडे, हरिश्चंद्र घाडगे, संतोष आढाव, नानासाहेब लांडे, महादेव ढवळे, संदीप आढाव आदी मान्यवर उपस्थित होते. ट्रस्टचे अध्यक्ष श्रीराम काळे यांनी सांगितले की, ''सरकारी मदतीची वाट पाहता पाहता अनेकांचे हाल होत आहेत. त्यामुळे अशा काळात समाजातील सक्षम व्यक्तींनी पुढे येणे गरजेचे आहे. आमचा ट्रस्ट सदैव गोरगरिबांच्या मदतीसाठी कार्यरत राहील. रयत समाचार





## देहाचं तादात्म्य सुटू न देता देहाचा विसर पडणे म्हणजे दसरा- ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली कराळे

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

भारतीय तत्वज्ञानात दोन नवरात्रोत्सवांचं आयोजन केलं जातं. एक वासंतिक आणि दुसरा शारदीय नवरात्रौत्सव. व्यासांनी, जनमेजयाला अनेक नवरात्रींचं महत्व सांगितलं. त्यात कन्यापूजनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. खरंतर हे उपवास निर्जळी असायला हवेत. परंतु, उपवासांच्या निमित्ताने आपण वेगवेगळे पदार्थ ग्रहण करतो. दसरा म्हणजे देहातील पंचज्ञानेंद्रिये आणि पंचकर्मेंद्रियांचं जगदंबेशी तादात्मीकरण करणे होय. देहाचा विसर पडणे म्हणजेच दसरा, असे चिंतन ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली कराळे महाराज यांनी सादर केले. पाथर्डी तालुक्यातील मोहोज देवढे येथे आशापुरा माता व रेणुका माता गडावर आयोजित करण्यात आलेल्या काल्याच्या कीर्तनाची सेवा देत असताना त्यांनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी जनार्धन पाटील काटे, साहेबराव देवढे, बबुजी आबा देवढे, भाऊसाहेब काटे, राजेंद्र गर्जे, प्रेमचंद खंडागळे, महादेव देवढे, ज्ञानेश्वर रावसाहेब देवढे, दत्तुभाऊ देवढे, रामकिसन देवढे, रामभाऊ देवढे, भाऊसाहेब देवढे, साहेबराव लोखंडे आदी ग्रामस्थांसह मोहोज देवढे गावाच्या पंचक्रोशीतील पुरुष व महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली देवढे, दत्तुजीजा देवढे, रंगनाथ कांजवणे, कैलासराव नरोटे, नारायण काटे, संभाजी देवढे, नामदेव गर्जे, कु. माधवी देवढे, साहेबराव पालवे यांच्यासह आळंदी येथील ज्ञानेश्वर महाराज देवढे यांच्या आश्रमातील बाल अनुयायांनी गायनाची सेवा दिली. जैमिनी देवढे यांनी पखवाज वादनाची सेवा दिली तर नारायण फरतारे यांनी हार्मोनियम वादनाची सेवा दिली. तसेच राधाकिसन देवढे यांनी वीणा वादनाची तर संगिता वाकचौरे यांनी तुळशी वृंदावन घेऊन कीर्तनाची साथ दिली. माया तेची ब्रम्ह आणि ब्रम्ह तेची माया, या विषयाला कीर्तनात गुंफत ज्ञानेश्वर महाराज यांनी गोकुळातील सवंगडी व भगवान श्रीकृष्णांत असलेल्या संबंधावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, देहाला देहाचा विसर, ज्ञानी माणसाला ज्ञानाचा विसर, दात्याला दानाचा विसर व श्रीमंताला धनाचा विसर पडला तरच आध्यात्माची पर्वणी साधली जाते. गोपाळ याच अवस्थेत होते म्हणून भगवान श्रीकृष्णांची त्यांच्याशी भेट झाली. वळल्या गायी धावे घरा। आमुच्या करी येरझारा।। हा संत तुकाराम महाराजांचा ऋतज्ञता व्यक्त करणारा अभंग आहे. याच अभंगाला विविध दृष्टांतांशी तादात्म्य पावते करत महाराज पुढे म्हणाले की, भगवान कृष्ण गोपाळांसाठी काय काय करतो तर तो त्यांच्या गायी वळतो-त्यांच्या घरी येरझारा घालतो. ज्याच्या वळत्या देव हाणत नाहीत त्याचा आसाराम होतो. इंद्रियरुपी गाय कधी एका ठिकाणी बसत नाही, कारण ती वढाळ असते. विषयांकडे जाणं हा इंद्रियांचा स्वभाव आहे. गोपाळ सर्व विषयांशी तटस्थ राहून भगवंतांचे दास झाल्याने त्याने त्यांना काही कमी पडू दिले नाही.काल्याच्या कीर्तनासाठी आवश्यक प्रसंग सांगून नवरात्रातील मातृत्वभाव कथन करताना ज्ञानेश्वर माऊली म्हणाले, माता म्हणजेच आई. आई हा एकमेव शब्द असा आहे की ज्यात व्यंजनाचा लवलेश नाही तर फक्त स्वर अंतर्भूत आहेत. प्रेमासाठी करुणास्पद प्रबोधन म्हणून संतांनी त्यांच्या वाङ्.मयात आई या शब्दाची योजना केली आहे. विश्वाच्या शब्दसृष्टीत निव्वळ स्वराने भरलेला शब्द केवळ आई हा आहे. आईचा रागही प्रेमाने ओतप्रोत भरलेलाच असतो. हाच भाग गोकुळातही भरला होता, म्हणूनच अवतारानंतर भगवान श्रीकृष्णांनी गोकुळ श्रीमंत करण्याचं पहिलं काम केलं. देव घरात येणं म्हणजे आधिभौतिक, देव अंतःकरणात येणं म्हणजे आधिदैहिक तर देव अनुभवास येणं म्हणजे आध्यात्मिकता आहे. पंजाब राज्यात अतिवृष्टी झाली तेव्हा तेथील कलावंतांनी पूरग्रस्तांना मदत केली परंतु महाराष्ट्राला उदात्त आध्यात्मिक वारसा असूनही एकाही नटाने मदत केली नाही हे दुर्दैव आहे. श्रीमंतांचा हात गरीबांच्या मुखात गेला पाहिजे. श्रीमंत व गरीब एकत्र येणं हाच खऱ्या अर्थाने काला असल्याचं प्रतिपादन करत त्यांनी आपल्या कीर्तनसेवेची सांगता केली.

रयत समाचार

## निंबळक मानाच्या देवीचा नवरात्रोत्सव उत्साहात संपन्न

### सोनिया गोरे यांच्या उपस्थितीत राखी फिरोदीयांना दिव्य कलश प्रदान



**नगर तालुका । रयत समाचार**

निंबळक येथील मानाच्या देवीचा नवरात्रोत्सव यंदा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. आयोजक संतोष घोलप यांनी २७०० किलोमीटर दूर गुवाहाटीच्या कामख्यादेवी मंदिरातून ज्योत आणून हा उत्सव कामख्यादेवीचा नवरात्र म्हणून साजरा केला. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पहिल्या माळेपासुनच धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल राहिली. उत्सवाच्या काळात राज्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर व त्यांच्या पत्नींनी आवर्जुन हजर राहत देवीचे भुभाशिर्वाद घेतले.

सातव्या माळेला (सप्तमीला) सोमवार, ता. २९ सप्टेंबर २०२५ रोजी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या पत्नी सोनियाताई गोरे यांनी निंबळक येथे देवीचे दर्शन घेतले. यावेळी शिवसेना प्रवक्ते तथा शिवप्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संजीव भोर यांनी विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी गोरे यांच्यासोबत बहिण स्मिता कदम व मिना जाधव उपस्थित होत्या. गोरे यांनी महिलांप्रती असलेली संवेदनशिलता त्यांच्या भाषणातून व्यक्त केली. विशेष म्हणजे, त्यांनी तब्बल सहा तास कार्यक्रमस्थळी उपस्थित राहुन महिलांशी संवाद साधला. तसेच संजीव भोर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना नवरात्रोत्सव हा संस्कृती जपणारा सण असल्याचे अधोरेखित करत हा उत्सव मातृशक्तीचा गजर करणारा असून यावेळी केली जाणारी घटस्थापना आपल्या प्राचीन सिंधू संस्कृतीचं जिवंतपणाचं प्रतीक असल्याचे स्पष्ट केले. तत्पूर्वी, पंचमीच्या दिवशी माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या पत्नी प्रतिभाताई पाचपुते यांनी कार्यक्रमास हजेरी लावली होती. त्यांना पंचमीचा सप्तगंगेचे जल असणारा दिव्य कलश प्रदान करण्यात आला.

तसेच यावर्षीच्या उत्सवातील विशेष आकर्षण असलेला आणि भारतातील सात नद्यांचे (सप्तगंगेचे) जल असणारा सप्तमीचा दिव्य कलश अहमदनगर येथील उद्योजक नरेंद्र फिरोदीया यांच्या पत्नी राखी फिरोदीया यांना सोनियाताई गोरे यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराज व जिजाऊ माँ साहेब यांचा जयघोष केला. कलश प्रदान करताना आयोजक संतोष घोलप यांनी फिरोदीया परिवाराचे समाजाप्रती मोठे कार्य असल्याचे नमूद केले. दरवर्षी धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक एकोपा जतन करणाऱ्या या भव्य नवरात्र उत्सवाची भक्तिमय वातावरणात सांगता झाली. कार्यक्रमासाठी किरण आंग्रे, बंटी थोरे, निलेश गेरंगे, घनश्याम म्हस्के, गोरख आढाव, पप्पू घोलप, बाळासाहेब घुले, सुनिल दुधाडे, संजय गवळी, पांडूरंग नगर मित्र मंडळ व महिला मंडळाने विशेष परीश्रम घेतले.



## शेवगावपैठण बससेवा सुरू; गदेवाडीत ग्रामस्थांचा जल्लोष

### चालक-वाहकांचा सत्कार

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव ते पैठण या मार्गावरील बससेवा आजपासून धडाक्यात सुरू झाली आहे.शेवगाव, बाभळगाव, कुरूडगाव, गदेवाडी, दहिगाव शे., खडका, चांगतपुरी मार्गे ही बस दररोज धावणार असून परिसरातील प्रवाशांसाठी ही सुविधा मोठा दिलासा ठरणार आहे. काल सकाळी ८ वाजता गदेवाडी येथील बस स्थानकावर ग्रामस्थांनी बससेवेचे जंगी स्वागत केले. ढोल-ताशांच्या गजरात चालक व वाहकांचा सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला. दररोज सकाळी ७.३० वाजता शेवगाव बस स्थानकावरून सुटणारी ही बस विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, वारकऱ्यांना धार्मिक यात्रेसाठी आणि ग्रामस्थांना दैनंदिन व्यवहारांसाठी अत्यंत उपयोगी ठरणार असल्याचे ग्रामस्थांनी मत व्यक्त केले. बससेवेच्या प्रारंभामुळे परिसरात आनंद व समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. रयत समाचार



## पिंपळगाव माळवीत विजयादशमी साजरी

**पिंपळगाव माळवी । रयत समाचार**

नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील ग्रामस्थांनी विजयादशमीच्या मुहूर्तावर गावाच्या सीमेवर जाऊन पारंपारिक पद्धतीने सिमोलंघन व सोने लुटण्याचा आनंद घेतला. अश्विन शुद्ध दशमी हा दिवस विजयादशमी म्हणून साजरा केला जातो आणि भारतीय परंपरेनुसार साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. या दिवशी सिमोलंघन, शमीपूजन, अपराजिता पूजन तसेच शस्त्रपूजन करण्याची परंपरा आहे. पिंपळगाव माळवी ग्रामस्थांनी विजयादशमीच्या मुहूर्तावर गावाच्या सीमेवर जाऊन शमी पूजन व सोने लुटण्याचा ऐतिहासिक आनंद घेतला. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी एकमेकांना आपट्याची पाने देऊन विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या. शमी पूजन पत्रकार खासेराव साबळे यांच्या हस्ते पार पडले, तर पूजा विधी अशोक देशपांडे यांनी केले. या सिमोलंघन सोहळ्यास संदीप झिने, सुनील गुंड, सुनील झिने, संतोष बनकर, रोहिदास पुंड व संदीप पवार उपस्थित होते.

## सानिका जठार हिने साकारली मनमोहक महालक्ष्मीची रांगोळी

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील डॉ. संतोष जठार यांच्या कन्या सानिका जठार हिने दसऱ्यानिमित्त ४ बाय ५ मीटर आकाराची करवीर निवासिनी महालक्ष्मी देवीची आकर्षक रांगोळी साकारली असून, काष्टी परिसरातून तिच्या कलाकृतीचे कौतुक होत आहे. सानिका ही परिक्रमा शैक्षणिक संकुलात इयत्ता ११ वी विज्ञान शाखेत शिक्षण घेत आहे. तिने यापूर्वीही अनेक सुबक रांगोळ्या रेखाटल्या आहेत. यामध्ये आषाढी एकादशीच्या निमित्ताने तिने पांडुरंगाची भव्य व दिव्य मूर्ती रांगोळीच्या माध्यमातून साकारली होती. सानिकाचे वडील डॉ. जठार हे गौरी-गणपती उत्सव काळात समाजप्रबोधनपर देखावे साकारतात. हे देखावे पाहण्यासाठी काष्टी परिसरातून भाविकांची गर्दी होत असते. या वेळी योगा सुप्रभात ग्रुपच्या सदस्यांनी रांगोळीला भेट देऊन सानिकाच्या प्रयत्नांचे कौतुक केले. रयत समाचार



## आधे इधर- आधे उधर, लेकिन सब मिली भगत; श्रीराम तरुण मंडळाच्या रावणाने वेधले नागरिकांचे लक्ष

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

शहराचे पहिले नगराध्यक्ष कै. रामचंद्र महाराज उपाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या श्रीराम तरुण मंडळाने यावर्षी ५७ व्या शारदोत्सवाची परंपरा कायम राखत नवरात्र उत्सव साजरा केला. दरवर्षी मंडळाचे आकर्षण असलेले रावण दहन यंदाही कार्यक्रमाची सांगता ठरले. या वर्षी रावणाच्या छातीवर ''आधे इधर- आधे उधर- लेकिन सब मिली भगत'' हा घोषवाक्य लिहून जनतेचे लक्ष वेधले गेले. ५७ वर्षांपूर्वी राम मंदिर चौकात श्रीराम शारदोत्सव मंडळाची स्थापना झाली. तेव्हापासून दरवर्षी मंडळातर्फे शारदोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. वेगवेगळ्या धार्मिक, पौराणिक आणि सामाजिक विषयांवर आधारित देखावे सादर केले जातात. यावर्षी मंडळाने आकर्षक विद्युत रोषणाई केली होती. नवरात्र उत्सवाच्या काळात पदवीधर मतदार



संघाचे आमदार सत्यजित तांबे यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून देवीची आरती केली. मंडळाचे प्रमुख अशोक उपाध्ये यांच्या नेतृत्वाखाली अनेक समाजोपयोगी उपक्रम यशस्वीपणे पार पडले आहेत. दरवर्षी विजयादशमीला होणारे रावण दहन हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरते. कारण रावणाच्या छातीवर लिहिले जाणारे घोषवाक्य शहरातील राजकीय आणि सामाजिक विषयांवर भाष्य करते. यंदा रावणाच्या छातीवर ''आधे इधर- आधे उधर- सब मिली भगत'' असा संदेश होता, ज्याची शहरात मोठी चर्चा झाली. सायंकाळी ८ वाजता राम मंदिर चौकापासून रावणाची मिरवणूक काढण्यात आली. शहीद भगतसिंग चौकात पाटाच्या कडेला मंडळाचा रावण दहन करण्यात आला. याप्रसंगी आमदार हेमंत ओगले, माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे, भाजपा नेते प्रकाश व दिपाली चित्ते, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, मंडळाचे अध्यक्ष सुरेश सोनवणे, मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष गौतम उपाध्ये, तसेच लकी सेठी, जयराम उपाध्ये, राजेंद्र उंडे, सतीश शहाणे, आयाज तांबोळी, मुन्ना पठाण, संजय गांगड, महेंद्र प. टारे, संजय यादव आदींसह शहरातील नागरिक, महिला, पुरुष, तरुण-तरुणी व मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते. रावण दहन आणि नवरात्र उत्सव यशस्वी करण्यासाठी दिनेश अंभोरे, बाळू उपाध्ये, संदीप शेडगे, अतुल उपाध्ये, राहुल उपाध्ये, राजेंद्र भावसार, सुमित कोठारी, बाळासाहेब क्षिरसागर, प्रदीप शहाणे, अमन मन्सुरी, जाफरखान, भैया अत्तार, सोमनाथ पतंगे आदी. रयत समाचार

# अभिजात मराठी

सपूर्ण महाराष्ट्राला व जगभरात पसरलेल्या मराठी जणांना अभिमान वाटावा अशी बातमी मागील वर्षी म्हणजे २०२४ च्या ३ ऑक्टोबर रोजी आली आणि महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांचा ऊर अभिमानाने भरून आला. ती बातमी होती मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा हे महाराष्ट्रातील तेरा कोटी जनतेचे स्वप्न होते. हे स्वप्न साकार होण्यासाठी कैक दशकांची वाट पाहावी लागली मात्र उशिरा का होईना हे स्वप्न साकार झाले. आता दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन म्हणून साजरा केला जातो. तसेच ३ ते ९ ऑक्टोबर दरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह घोषित करण्यात आला आहे. अभिजात मराठी भाषा दिनाच्या जगभरातील मराठी जणांना मनापासून शुभेच्छा त्यासोबतच भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी संघर्ष करणाऱ्या हजारो ज्ञात – अज्ञात व्यक्तींनाही सलाम. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मराठीसह पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांना देखील अभिजात भाषेचा दर्जा दिला. त्याआधी संस्कृत, तमिळ, तेलगू, कन्नड, उडिया, मल्ल्याळम या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. आता मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठीच्या श्रेष्ठत्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. अर्थात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्याचा प्रवास सोपा नव्हता. एक हजार वर्ष जुनी व पाच हजार बोलीभाषेपासून तयार झालेली अमृतातही पैज जिंकणारी मराठी भाषा अभिजात भाषेसाठी लागणारे सर्व निकष पूर्ण करत असूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळत नव्हता. मराठी भाषा ही मराठी संस्कृतीचा अस्सल आधार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी शासकीय पातळीवर अनेकदा प्रयत्न झाले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी मागणी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली होती, त्यासाठी आवश्यक असणारे सर्व पुरावे राज्य सरकारने केंद्र सरकारकडे ९ वर्षापूर्वीच सोपवली होती. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी प्राध्यापक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली १० जानेवारी २०१२ रोजी अभिजात मराठी भाषा समिती स्थापन करण्यात आली होती. मराठी भाषेचे संशोधन करून व सूक्ष्म अभ्यास करून पुरावे गोळा करण्याचे काम या समितीकडे सोपवण्यात आले होते. प्रा रंगनाथ पठारे यांच्यासमवेत प्रा हरी नरके आणि व अन्य काही सदस्य या समितीत होते. या समितीने अतिशय सूक्ष्म अभ्यास करून मराठी भाषा अभिजात भाषेसाठी कशी पात्र आहे याचे सर्व पुरावे गोळा करून शासनाकडे सोपवले होते. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यास विरोध करणारी याचिकाही उच्च न्यायालयाने फेटाळली होती तरीही मराठी भाषा अभिजात दर्जापासून वंचित होती. आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर मराठा भाषेच्या संवर्धनासाठी केंद्राकडून जास्तीचा निधी मिळेल त्यामुळे मराठी भाषेची उंची आणखी वाढेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेची प्रतिष्ठा आणखी वाढेल. आता मराठी भाषेच्या श्रेष्ठत्वावर राज्यमान्यतेची मोहर उमटली आहे. मुख्य म्हणजे आता मराठी भाषेच्या विकास कार्याला अधिक चालना मिळणार आहे. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय होणार आहे. महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालयांना सशक्त करण्यासाठी केंद्र सरकारकडून अधिकचा निधी मिळणार आहे त्यामुळे प्राचीन ग्रंथ अनुवादित करणे सुलभ होणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने दरवर्षी मराठी भाषेतील दोन विद्वानांना राष्ट्रीय पुरस्कार मिळतील. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले आहे याचा महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जणांना अभिमान आहे. म्हणूनच अभिमानाने म्हणावेसे वाटते लाभले भाग्य आम्हास...

बोलतो मराठी....



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# कोतवाल तुम्ही मनावर ही केस नाही घेतली...!



**स्वतःचं नांव संजय असं सांगत असलेला हा इसम मनोरुग्ण नक्कीच नाही. कारण तो मनोरुग्ण असता तर त्याने प्रवाशांना त्रास दिला असता. तो दिवसभर फक्त शांतपणे बसून राहतो आणि रात्री झोपी जातो. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीदरम्यान कुणीतरी त्याच्या अंगावर तरट आणून टाकला होता. त्या काळात तेच त्याच घर होतं. परंतु, आता त्याला सुरक्षित ठिकाणी नेऊन ठेवलं तरंच तो जीवंत राहू शकतो.**

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी शहरातील चोरडिया मळ्याच्या शेजारी शेवगाव रस्त्यावर, गेल्या तीन-साडेतीन महिन्यांपासून हा इसम वास्तव्यास आहे. स्वतःचं नांव संजय असं सांगत असला तरी गांव वगैरे काहीही सांगत नाही. अंगात अशक्तपणा असल्याने त्याचा आवाजही अतिशय क्षीण होत चालला आहे. रस्त्याच्या कडेलाच झोप घेत असल्याने, त्याच्या जीवावर सतत टांगती तलवार आहे.

पाथर्डी-शेवगाव रस्त्यावर आल्यानंतर त्याने सुरूवातीला राहुल कोठारी यांच्या इमारतीतील आरोग्यदीप हॉस्पिटलच्या समोर असलेल्या चिंचेच्या झाडाखाली आश्रय घेतला होता. तत्पुर्वी त्याने कचरा गोळा करून स्वतः साठी अंथरुण तयार केले होते. परंतु, पाऊस सुरू झाल्यानंतर मात्र तो कोठेतरी मुक्काम करतो आणि पाऊस उघडताच परत धोकेदायक वळणावर पथारी अंथरतो. पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी पाथर्डी पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या कानावर हा विषय दोन वेळा घातला.

वृत्तीने धार्मिक असल्याने त्यांनी वाहतूक पोलीस नाईक अलताफ शेख यांना सांगून त्याला पुन्हा चिंचेच्या झाडाखाली आणून बसवले होते.

परंतु, पाऊस सुरू होताच तो परत गायब झाला आणि पुन्हा त्याच वळणावर येऊन बसलेला दिसला. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीतही त्याचा दिनक्रम असाच सुरू आहे. भारतात मानवता धर्म पाळला जात असल्याने तो उपाशी रहात नाही, परंतु दिवसेंदिवस खंगत चालला आहे. दोन दिवसांपूर्वी, स्नेहालयचे संचालक संजय मेहेरकर यांच्या कानावर हा प्रकार घातल्यावर त्यांनी तत्परतेने त्याची वास्तपुस्त करुन त्याला जेवणही आणून दिले होते. त्यात, त्याच्या आवडीचा पदार्थ समोसाही होता. त्याची सखोल चौकशी करुनच त्याला स्नेहालयात भरती करता येईल, असेही त्यांनी सांगितले. परंतु, कदाचित तोवर खूप उशीर झालेला असेल आणि हळहळ व्यक्त करण्यापलीकडे काहीच करता येणार नाही म्हणून पोलीस निरीक्षक विलास पुजारी व संजय मेहेरकर यांनी लवकरात लवकर काहीतरी निर्णय घ्यावा, यासाठी हा लेखनप्रपंच केला आहे. आठवडाभरापूर्वी प्रा. श्रीकांत काळोखे यांनीही मला भ्रमणध्वनी करुन हळहळ व्यक्त केली होती.

नवरात्राची धामधूम सुरू असूनही श्री पुजारी यांनी काहीतरी करतो म्हणून आश्वासन दिलं होतं, पण कामाच्या धबडग्यात कदाचित ते विसरले असावेत. म्हणूनच सांगावं वाटलं की, कोतवाल तुम्ही, मनावर ही केस नाही घेतली...! रयत समाचार

## मिशन माणुसकी : दैनिक रयत समाचारच्या पूरग्रस्त सहकार्य आवाहनास प्रतिसाद

# दसऱ्याला सोने लुटलं गेलं ते हक्काच्या अन्नधान्याचे आणि माणुसकीच्या नात्याचे

## पुरग्रस्त शेतमजूर आदिवासींना किराणा वितरण

**नगर तालुका । रयत समाचार**

दसरा सणाच्या दिवशी दैनिक रयत समाचार टीमने लोकसहभागातून संकलित केलेला किराणा पिंपळगाव माळवी परिसरातील पुरग्रस्त भिल्ल आदिवासी शेतमजूर बंधूभगिनींना वितरीत केला. या उपक्रमासाठी डॉ. रविकांत पाचारणे आणि सहकारी, कविता कराळे आणि सहकारी, शिक्षिका ललिता केदारे, ह.भ.प. अजय महाराज बारस्कर, छायाचित्रकार संजय वाघ, इंजि. प्रशांत पाटील, अभिजित अनाप साहेब, दत्ताभाऊ वडवणीकर, विष्णू भुतकर (निशांत झोपडी कँटिन संचालक) यांच्यासह अनेक जाणत्या व्यक्तींनी सहकार्य केले. टीम रयत समाचारचे संतोष गायकवाड, दिपक



शिरसाठ, तुषार सोनवणे, अतुल देठे, विजय केदारे, पंकज गुंदेचा, मरयम सय्यद, एस्थर ऱ्होलुपुई, बिजेएमसीच्या विजयाताई काळे, नवनाथ मगर, किपर आदींचे सहकार्य आहेच तसेच सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, सॅम्युअल वाघमारे, प्रा. सुरेश मुगुटमल, लोकमतचे सुधीर लंके, पत्रकार खासेराव साबळे आणि एमएसडब्ल्यू विद्यार्थी देखील याकामी सोबत होते. अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले. शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण कारागिरांचे संसार उद्ध्वस्त झाले. कामे बंद पडल्याने चुली विझल्या, लेकरांची शाळा बंद झाली, आयाबायांच्या डोळ्यात काळोख दाटला. शासनाकडून मदतीची प्रतीक्षा असतानाच, 'मिशन माणुसकी' म्हणून किराणा पोहोचल्यावर आदिवासी वस्त्यांवर आनंद ओसंडून वाहत होता. म्हाताऱ्या-कोताऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले, लेकरांनी उड्या मारत आनंद साजरा केला. दसऱ्याच्या या सकाळी सोने लुटलं गेलं ते हक्काच्या अन्नधान्याचं आणि माणुसकीच्या नात्याचं!

# कुपनलिका खोदून मातीने भरल्या गटारी

## डासांच्या प्रादुर्भावाने नागरिक हैराण



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

महानगरपालिकेच्या वतीने वडगाव चावडी गल्ली येथे कुपनलिका खोदण्यात आली. मात्र खोदकामानंतरची माती गटारीतच टाकून दिल्याने गटारी तुंबल्या असून पाण्याचा निचरा पूर्णपणे बंद झाला आहे. परिणामी साचलेल्या घाण पाण्यातून डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे.या संदर्भात स्थानिक नागरिकांनी नगरसेविका रेश्मा कामकर यांच्याकडे तक्रार नोंदवली आहे. मात्र वीस दिवस उलटूनही गटारीतील माती काढण्यात आलेली नाही. पावसाचे पाणी व सांडपाणी गटारीत साचल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांना आरोग्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.आधीच साथीच्या आजारांनी नागरिक हैराण असताना, गटारी तुंबल्याने डासांची उत्पत्ती अधिकच वाढली आहे. या परिस्थितीमुळे नागरिक त्रस्त झाले असून तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे. गटारीतील माती त्वरित काढून टाकून निचरा सुरळीत व्हावा आणि परिसर स्वच्छ राहावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

रयत समाचार

# अतिवृष्टीग्रस्त नुकसानीचे पंचनामे सुरू

## भीमराज आव्हाड यांचे उपोषण स्थगित





**नगर तालुका । विजय मते**

पांगरमल गावात पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून संपूर्ण शेती पाण्याखाली गेली आहे. राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, जिल्हाधिकारी, तहसीलदार, तसेच लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी करून पंचनामे करण्याचे आदेश दिले होते. मात्र, पांगरमल गावात अद्याप पंचनामे न झाल्याने शेतकरी मदतीपासून वंचित होते. ग्रामसेवक वारंवार गैरहजर राहतात, या तक्रारीवरून पांगरमलचे माजी सरपंच भीमराव आव्हाड यांनी ग्रामपंचायतीला कुलूप ठोकत शेतकऱ्यांसह ग्रामपंचायत समोर उपोषण सुरू केले. यावेळी पांडुरंग आव्हाड, महादेव आव्हाड, नारायण आव्हाड, नवनाथ आव्हाड, अंबादास आव्हाड, नामदेव आव्हाड, बाबुराव वाकडे, मिठू आव्हाड, रेवनाथ आव्हाड, अंजाबापू आव्हाड, हरिभाऊ आव्हाड, अक्षय आव्हाड, अजित आव्हाड, संतोष आव्हाड, प्रकाश आव्हाड, सुनील आव्हाड, तुकाराम आव्हाड, सतीश आव्हाड यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनाची दखल घेत ग्रामवसूल अधिकारी राजेंद्र सांगळे यांनी पांगरमलमध्ये तातडीने पंचनामे करण्याचे आश्वासन दिले. ग्रामसेविका तातडीने पंचनामे सुरू करतील, असे सांगताच आव्हाड यांनी उपोषणाला स्थगिती दिली. पांगरमल गावातील शेतकऱ्यांनी ग्रामसेविका अर्चना अडसुरे सतत गैरहजर असल्याची तक्रार केली होती. पंचनामेच न झाल्याने मदत मिळण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे माजी सरपंच आव्हाड यांनी ग्रामपंचायतीला कुलूप ठोकून ग्रामसेविकेच्या बदलीची मागणी करत उपोषण सुरू केले होते. या परिस्थितीची माहिती मिळताच तलाठी राजेंद्र सांगळे गावात दाखल झाले. त्यांनी वस्तुस्थितीची पाहणी करून तातडीने पंचनामे सुरू करण्याचे आदेश दिले. त्यानुसार ग्रामसेविका अर्चना आडसुरे, जेऊर मंडळ अधिकारी राम नलवडे, कृषी सहाय्यक डुकरे आदींनी ग्रामस्थांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनाम्यांना सुरुवात केली. सांगळे यांच्या मध्यस्थीमुळे उपोषण स्थगित झाले असून शेतकऱ्यांचे पंचनामे तातडीने सुरू झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. रयत समाचार

# दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा करणार- नागवडे

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखाना २०२४-२५ गळीत हंगामात गाळप झालेल्या ४ लाख ७६ हजार ५८९.२४६ मे.टन ऊसाकरिता प्रति मे.टन २५० रुपये या प्रमाणे ११ कोटी ९२ लाख रुपये अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात १३ ऑक्टोबर रोजी जमा करणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी दिली. तसेच कामगारांना ८.५० टक्के बोनस दिवाळीपूर्वी अदा करण्यात येणार आहे. कारखान्याने यंदाच्या हंगामातील संपूर्ण एफ.आर.पी. पेमेंट प्रति मे.टन २८०० रुपये दिले आहे. सभासदांची दिवाळी गोड करण्यासाठी अतिरिक्त अनुदान देण्याचा निर्णय घेतल्याचे नागवडे यांनी सांगितले. प्रत्येक सभासदाला दिवाळीसाठी दहा किलो साखर प्रति किलो २० रुपये या दराने वितरित केली जाणार असून, श्रीगोंदा, काष्टी, बेलवंडी, घारगाव, इनामगाव व कारखाना साईट या सहा ठिकाणी ५ ते २१ ऑक्टोबरदरम्यान साखर वाटप होईल. सभासदांनी आधारकार्डसह हजेरी लावून साखर घ्यावी, अन्यथा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.



स्व. शिवाजीराव नागवडे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत कारखान्याने अडचणींवर मात करत काटकसरीचा कारभार केल्याचे सांगून, नागवडे म्हणाले की, ''शेतकऱ्यांना रास्त ऊस भाव देण्याची परंपरा कायम ठेवणार असून, आगामी हंगामातही कारखाना मागे राहणार नाही.'' या बैठकीस उपाध्यक्ष बाबासाहेब भोस, सर्व संचालक मंडळ सदस्य व कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे उपस्थित होते. रयत समाचार

# नेप्ती मंडलातील दहा गावातील पिक पंचनाम्यांना वेग

## चिखल तुडवत २३१९ पंचनामे पूर्ण

**नगर तालुका । रयत समाचार**

नगर तालुक्यातील नेप्ती महसूल मंडळातील नेप्ती, निमगाव वाघा, हिंगणगाव ,जखणगाव, हिवरे बाजार, टाकळी खातगाव, आदी दहा गावांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पावसाने उघड दिल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या पिकांच्या पंचनाम्याना वेग आला आहे. संबंधित अधिकारी चिखल तुडवीत शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन पंचनामा करीत असल्याने शेतकऱ्याला मोठा दिलासा मिळत आहे.

शेत पीक व फळबागांचे या भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. बाधित शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत अशी माहिती नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे यांनी दिली. सध्या पंचनाम्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. हे काम उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अहिल्यानगर तहसीलदार यांच्या



आदेशानुसार राबविले जात आहे. प्रत्येक गावात ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि सहाय्यक कृषी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून पर्यवेक्षण अधिकारी म्हणून नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे यांची नेमणूक करण्यात आली आहे. या आदेशानुसार नेप्ती मंडळातील नेप्तीच्या ग्राम महसूल अधिकारी सुवर्णा रांधवण, निमगाव वाघाचे ग्राम महसूल अधिकारी विनायक दिक्षे, हिंगणगावचे ग्राम महसूल अधिकारी दिपक झेंडे, जखणगावच्या ग्राम महसूल अधिकारी दिपाली विधाते, हिवरे बाजारचे ग्राम महसूल अधिकारी श्रीकृष्ण निमसे, टाकळी खातगावच्या ग्राम महसूल अधिकारी रूपाली म्हस्के यांनी समितीतील इतर नियुक्त सदस्यांसह आपल्या गावात पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे. या गठीत समितीने नेप्ती गावात पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकरी भानुदास विठोबा फुले यांच्या कांदा पिकाची पाहणी केली. यावेळी मंडळ अधिकारी प्रताप कळसे, कृषी अधिकारी रावसाहेब नवले, ग्राम महसूल अधिकारी सुवर्णा रांधवण तसेच माजी सरपंच संजय जपकर, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, हरणाबाई फुले, प्रकाश बेल्हेकर, अरुण बेल्हेकर ,राजू साळुंके ,सिताराम बेल्हेकर ,नामदेव बेल्हेकर, अर्णव बेल्हेकर, यश बेल्हेकर ,सुरज साळुंके, जालिंदर बेल्हेकर व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सध्या मंडळातील सुमारे ३ हजार शेतकऱ्यांपैकी २३१९ शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण करण्यात आले आहेत. यात सुमारे १७१४ हेक्टर क्षेत्र बाधित असल्याचे नोंदवले गेले आहे. याशिवाय ४ घरांची आणि ४ विहिरींची पडझड झाल्याचे पंचनाम्यात नमूद करण्यात आले असून त्यांचे पंचनामेही पूर्ण झाले आहेत. नेप्ती महसूल मंडळातील ६८१ शेतकऱ्यांच्या सुमारे ५०१ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे अद्याप बाकी असून हे काम पुढील दोन दिवसांत पूर्ण केले जाणार आहेत असे मंडळ अधिकारी प्रताप कळसे यांनी सांगितले . पंचनामे तातडीने सुरू करून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केल्यामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. बाधित शेतकऱ्यांना मदतीसाठी शासनाकडून तातडीने निर्णय होण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.